# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

वाचा- 1- या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डिसी-1/Crpc-144 **कावी** दि.31/03/2020 व 13/04/2020

**2- या कार्यालयाचे आदेश** जा.क्र.**2020/डिसी-1/ कोवीड-19/**कावी- **दिनांक 06/04/2020 व दि.09/04/2020**

**3-** महाराष्ट्र शासनाची अधिसुचना No.DMU/2020/CR.92/DisM-1दि.13/04/2020

4- या कार्यालयाचे आदेश जा.क्र.२०२०/डी.सि.-०१/covid १९/का.वि. दि.१३.०४.२०२०

5- महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.१७.०४.२०२०

---

जा.क्र.**2020/डिसी-1/कोवीड-19/**कावी- दिनांक.**19.04.2020**

**सुधारित आदेश:-**

**ज्याअर्थी**, जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) हा विषाणू मूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषत केला आहे. कोरानाग्रसत रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवू नये म्हणुन सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक निर्माण होऊ शकतो या मुळे फौजदारी प्रकीया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये संपुर्ण जिल्हयामध्ये संचारबंदी लागु झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

खरीप हंगाम हा जवळ येत आहे व व्यापा-यांना खते व बियाणेचा साठा करणे साठी तसेच शेतीसाठी उपयोगी महत्वाचे साहित्य जसे की ड्रीप, स्प्रिंकलर व पाईप पुरवठा सुरळीत असणे आवश्यक असल्याने ही सर्व दुकाने व जिल्हयातील परवाना धारक कृषी सेवा केंद्र, उघडणे आवश्यक असल्याने या कार्यालयाचे संदर्भीय आदेश क्र.4 अन्वये ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार सकाळी 9.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत सुरु ठेवणे करीता आदेश निर्गमित करण्यात आले होते. परंतु संदर्भ क्र. 5 नुसार शेतीसाठी उपयोगी महत्वाचे साहित्य जसे की ड्रीप, स्प्रिंकलर व पाईप पुरवठा सुरळीत असणे आवश्यक असल्याने ही सर्व दुकाने व जिल्हयातील परवाना धारक कृषी सेवा केंद्र, कृषी विषयक कामे व तसेच कृषी व बागायती कामासाठी लागणारे साहित्य विक्री व उत्पादन करणे, कृषी माल खरेदी विक्री केंद्रे यांना यामधून सूट दिली आहे.

**त्याअर्थी, मी रुचेश जयवंशी जिल्हादंडाधिकरी हिंगोली, जिल्हयातील व्यापा-यांना खते व बि-बियाणेचा साठा करणे साठी तसेच शेतीसाठी उपयोगी महत्वाचे साहित्य जसे की ड्रीप, स्प्रिंकलर व पाईप पुरवठा सुरळीत असणे आवश्यक असल्याने तसेच कृषी विषयक कामे व तसेच कृषी व बागायती कामासाठी लागणारे साहित्य विक्री व उत्पादन करणे, कृषी माल खरेदी विक्री केंद्र ही सर्व दुकाने व जिल्हयातील परवाना धारक कृषी सेवा केंद्र दि.20.04.2020 पासून प्रतिदिन सकाळी 9.00 ते दुपारी 1.00 यावेळेत खालील अटी व शर्तीचे पालन करून सुरु ठेवण्या साठी परवानगीचे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.**

**<u>अटी व शर्ती:</u>**

1. संबंधितांनी दि.20.04.2020 पासून दुकानाची सुरुवात करताना संपूर्ण जागेचे Sanitization करूनच सुरुवात करावी.
2. दुकानातील कामगार / खरेदीदार यांची नोंद ठेवणे गरजेचे आहे जसे कि नाव, संपर्काचा पता व मोबाईल क्रमांक.
3. दुकानदाराने व त्यांच्या सोबत काम करणाऱ्या कामगारांनी नेहमीच नाक व तोंड मास्कने पूर्णपणे झाकून ठेवणे बंधनकारक आहे.
4. खरेदी करण्यासाठी आलेल्या दोन ग्राहकामध्ये 1 मीटर अंतर राहील याची दक्षता संबंधित विक्रेत्याने घ्यावी तसेच sanitizer उपलब्ध ठेवण्यात यावे.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

5. खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांना उभे राहण्यासाठी दुकानासमोर 1 मिटरचे अंतराने गोल/चौकोन आखणी करणे आवश्यक राहील.
6. दररोज कामावर येणा-या कामगारांची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करण्यात यावी.
7. दुकानदारांनी कामगारासाठी मास्क व Sanitizer उपलब्ध करुन देण्यात यावेत.
8. दुकानाच्या परिसरामध्ये कामगारासाठी पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याच्या पाण्याची व्यवस्था योग्य ठिकाणी करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहील यांची दक्षता घेण्यात यावी.
9. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमाचे तंतोतंत पालन करून उदयोग धंदयाच्या ठिकाणी व परीसरामध्ये सामाजीक अंतराचे (social Distance) पालन करण्यात यावे व जागोजागी सुरक्षिततेच्या उपाय योजनांचे माहिती फलक लावण्यात यावेत.

या आदेशामध्ये नमुद कालावधी वगळता इतर कालावधीमध्ये कोणासही घराच्या बाहेर पडता येणार नाही. तसेच आदेशाचे पालन न करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करण्यात येईल यांची दक्षता घ्यावी.

संबंधित आस्थापना मालक/चालक/व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, उप विभागीय दंडाधिकारी, तालूका कार्यकारी दंडाधिकारी, पोलीस स्टेशन, सर्व जि.हिंगोली यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. हे आदेश दिनांक.19/04/2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

स्वा

(रुचेश जयवंशी)

**जिल्हादंडाधिकारी हिंगोली**

प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर

1.मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-32.

2.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

प्रतिलीपी - आवश्यक कार्यवाहीस्तव

1.पोलीस अधिक्षक हिंगोली

2.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली

3.उपविभागीय दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत

4.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, हिंगोली

5.उपायुक्त पशुसर्वधन, हिंगोली.

6.मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी, हिंगोली.

7.तालुका दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/सेनगाव/वसमत/औंढा ना. यांना देवुन आदेशीत करण्यात येते की, आदेशात नमुद केल्या प्रमाणे आपल्या स्तरावरुन कार्यवाही अनुसरण्यात यावी.

8.मुख्याधिकारी नगरपालीका/नगर पंचायत हिंगोली/वसमत/कळमनुरी/सेनगांव/औंढा यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

9.जिल्हा माहीती अधिकारी हिंगोली यांना प्रसिधीस्तव.

(रुचेश जयवंशी)

**जिल्हादंडाधिकारी हिंगोली**

Scanned by CamScanner